क्रमांक : ३२११/ई-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२२.

**:: परिपत्रक ::**

**विषय : महाराष्ट्र विधानपरिषदेचे सन २०२२ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील तारांकित प्रश्नांच्या उत्तराकरीता नेमून देण्यात आलेल्या दिनांकाबाबतचे विवरणपत्र**
**संदर्भ : या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १४८५/ई-१, दिनांक २७ जानेवारी, २०२२.**

विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या मंगळवार, दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सोमवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२ रोजीपासून सुरु होणारे आगामी प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन, २०२२, विधान भवन, नागपूर ऐवजी आता गुरुवार, दिनांक ३ मार्च, २०२२ रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरु होणार आहे. त्यानुसार शनिवार, दिनांक ५ मार्च, २०२२ रोजी सुट्टीच्या दिवशी सभागृहाची बैठक घेण्यात येणार असून, उक्त दिवशी गट क्रमांक ३ ची बुधवार, दिनांक २ मार्च, २०२२ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहात चर्चेला घेण्यात येईल. गट क्रमांक ३ मध्ये (१) मुख्यमंत्री (२) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री (३) गृहनिर्माण मंत्री (४) नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांचा समावेश असून यादीतील प्रश्नांचा विभागाकडून उत्तर मिळण्याचा दिनांक पूर्वीप्रमाणेच राहील.

ध.जगताप

**(धनश्री जगताप)**
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

(१) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
(२) मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
(३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
(४)सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
यांना माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी अग्रेषित